**ललिता गंडभीर**
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-3
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# उलट

.

अॅलन (ALAN) कालच या खेळणी तयार करण्याच्या व घाऊक विकण्याच्या प्रचंड मोठ्या कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून नोकरीला लागला होता. कंपनीमध्ये खेळण्याचे भाग बनवायचा व ते जोडायचा, पॅक करायचा, बाहुल्यांचे कपडे बनवायचा, मुलांच्या सायकलींचे वेगवेगळे भाग बनवून एकत्र बसवायचे असे खेळणी बनविणारे अनेक विभाग होते. शिवाय विक्रीची बिले पाठविणारे, पैसे गोळा करणारे, गिऱ्हाईकांच्या तक्रारी ऐकून घेणारे, नव्या खेळण्यांच्या डिझाईनचे संशोधन करणारे अशी अनेक खातीही होती. ह्या सर्वांचे टपाल एका मध्यवर्ती जागी सकाळी येऊन पोचत असे. वेगवेगळ्या खात्यांचे टपाल निवडून एकत्र करायचे आणि मग ते त्यांना पोचवायचे हे अॅलनचे काम.

अॅलन नुकताच नोकरीला लागला होता म्हणून त्याला टपालाची व कंपनीच्या विभागाची माहिती करून द्यायला रोवन हा पूर्वीचा मेल बॉय अजून टपालविभागातच काम करत होता. एका आठवड्यात अॅलनला टपालखात्याची माहिती झाली की रोवन विक्रीखात्यात बदलून जाणार होता. रोवनने स्वतःच अर्ज करून विक्रीखात्यातली बिलिंग क्लार्कची नोकरी मिळवली होती. कारण बिलिंग क्लार्कचा पगार थोडा जास्त होता व बढती मिळण्याची संधीही होती. आपण मेल बॉयची नोकरी सोडून बिलिंग क्लार्कची नोकरी का धरली ह्याची करणे रोवनने अॅलनला पहिल्याच दिवशी सांगितली व वरती “ही कंपनी चांगली आहे. बढती मिळून वर चढायची संधी सर्वांनाच ही कंपनी देते. तू सुद्धा दुसऱ्या खात्यात वर्षभराने जायचा प्रयत्न कर.” असा सल्लाही दिला.

अॅलन नोकरीच्या दुसऱ्याच दिवशी अगदी भांबावलेला होता. रोवनने त्याला कंपनीच्या सर्व शाखांतून दोन तास पायपीट करून हिंडवून आणले होते. पंधरा एकर जमिनीवर कंपनीच्या वेगवेगळ्या खात्यांच्या विटांच्या इमारती अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. कारण एका लहान खोलीत सुरु झालेली ती कंपनी वाढत वाढत एवढी प्रचंड झाली होती व मालकांनी जरूर पडेल तशा आणखीही बऱ्याच इमारती बांधल्या होत्या. मूळचा एक आराखडा नसल्याने कंपनी अव्यवस्थितपणे वाढली होती. काही इमारती लोखंडी, लहान, अरुंद ढकलगाडी नेण्याएवढ्या पार्किंग लॉटवरून बांधलेल्या पुलांनी जोडलेल्या होत्या. कुठल्याही प्रकारच्या खात्यातली वाहतूक निर्वेधपणे सुरु रहावी म्हणून पुलांची व

भुयारांची योजना होती. ठिकठिकाणी खात्यांच्या नावांच्या पाट्या होत्या व इतर खात्यांकडे जाण्यासाठी मार्गदर्शन म्हणून माहितीही टांगून ठेवली होती. तरी ॲलन पूर्ण गोंधळला होता.

"तू अगदी काळजी करू नकोस" रोवनने त्याला आश्वासन दिले. "मीही सुरवातीला असाच गोंधळलो होतो. दोन-तीन आठवड्यात ह्या चक्रव्यूहातून तुला डोळे मिटून हिंडता येईल."

मग रोवनने ॲलनला पत्रांच्या ढिगाऱ्यातून प्रत्येक खात्याची पत्रे बाजूला कशी काढायची हे शिकविले. कठीण काम होते यादीचे. प्रत्येक खात्यात काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाची एक यादी होती. ज्याचं त्याचं टपाल वेगळं करून त्यांच्या त्यांच्या ऑफिसात पोचवावं लागत असे. काही पत्रे खात्यांची नवे न घालताच येत. ती पत्रे उघडून कुठल्या खात्याकडे पाठवायची हे पण ठरवायचे काम ॲलनचे होते.

ॲलनला कंपनीची कॅफेटेरिया मात्र मनापासून आवडली. ही मध्यवर्ती इमारत हल्लीच बांधलेली म्हणून आधुनिक होती. तिथे विविध आकारांची टेबले व खुर्च्या मांडल्या होत्या. दोन ते पंचवीस माणसांना एकदम लंच घेता येईल अशी व्यवस्था केलेली होती. कॅफेटेरियात माफक दरात खाद्यपदार्थ विकले जात. एका दिवसातच ॲलनची त्याच्या वयाच्या अनेक मुलामुलींशी ओळख झाली होती. तेव्हा लंच ब्रेकचा तास ॲलनला मनापासून आवडू लागला होता.

ॲलनने पहिल्याच दिवशी कॅफेटेरियाच्या कोपऱ्यात एक वेगळी खोली पाहिली होती. त्या खोलीत पांढरा टेबल क्लॉथ घातलेले एक मोठे डायनिंग टेबल होते. टेबलावर फुलदाण्या होत्या. त्या खोलीतल्या खुर्च्या कॅफेटेरियातल्या लाकडी खुर्च्यांसारख्या साध्या नसून कुशनवाल्या होत्या.

नोकरी लागल्यावर चवथ्या दिवशी ॲलन,रोवन व इतर काही कंपनीचे कामगार लंच घेत बसले होते. तेव्हा सूट घातलेली टाय लावलेली काही प्रौढ मंडळी कॅफेटेरियात उगवली व त्या खोलीत जाऊन स्थानापन्न होऊ लागली.

त्यांच्या वेषावरून- वागण्यावरून हे वरिष्ठ अधिकारी आहेत हे ॲलनने ओळखले. तो काही विचारणार तेवढ्यात रोवन म्हणाला, "हे सगळे कंपनीचे वेगवेगळ्या खात्यांचे व्हाइस प्रेसिडेंट्स. दर गुरुवारी त्यांची मिटिंग असते."

ॲलन आ वासून सगळ्या व्हाइस प्रेसिडेंट्सकडे बघू लागला. रोवन प्रत्येक व्हाइस प्रेसिडेंटच्या खात्याचं व व्हाइस प्रेसिडेंटचं नाव सांगू लागला. चेहरे ओळखीचे नसले तरी एव्हाना ॲलनला त्यांची नावं टपालातल्या यादीवरून ठाऊक होती. त्यांच्याकडे बघता बघता ॲलनच्या मनात सूक्ष्मशी असूयेची कळ उठली.

"त्यांना किती पगार मिळतो?" ॲलनने रोवनला विचारले.

"मला ठाऊक नाही पण आपल्यापेक्षा पुष्कळ जास्ती हे नक्की." रोवन म्हणाला.

मग आत येणाऱ्या उंच, गडद निळ्या डोळ्याच्या व्हाइस प्रेसिडेंटकडे पाहून तो उद्गारला, "हा पाहिलास का मिस्टर ट्रेसी? तो मेल बॉय म्हणून कंपनीत लागला होता. चढत चढत विक्रीखात्याचा व्हाइस प्रेसिडेंट झालाय. मेलरूममध्ये तो मधून मधून येतो. गप्पा मारतो. थोडावेळ

मेल निवडून वेगळी करायला मदत करतो. जुन्या आठवणीखातर करतोय असं म्हणतो. मग गेले ते दिवस म्हणून सुस्कारा सोडतो."

"सगळ्या मेल डिलिव्हरी बॉइजची तो ओळख करून घेतो. तुझीही होईल. मला बिलिंग क्लार्कची नोकरी मिळवून द्यायला त्यानेच मदत केली." रोवनची टकळी चालूच होती. पण त्याकडे ॲलनचं लक्ष नव्हतं.

"मेल बॉय....व्हाइस प्रेसिडेंट" हे दोनच शब्द त्याच्या काना घुमत होते. मिस्टर ट्रेसी मेल बॉयचा व्हाइस प्रेसिडेंट झाला तर मीही होऊ शकेन हा एकच विचार त्याच्या डोक्यात घोळत होता.

त्याच्या मनःचक्षूसमोर आपण सूट घालून,टाय लावून मोठ्या व्हाइस प्रेसिडेंटच्या डेस्कसमोर बसलो आहोत व एक मेल बॉय आपल्याला अद्बीने टपाल आणून देत आहे असे चित्र उभे राहिले.

खरे म्हणजे ॲलनला अशी नोकरी करायची नव्हती. त्याला अगदी मनापासून कॉलेजात जायचं होत. तेही साध्यासुध्या कॉलेजात नाही. हार्वडसारख्या उत्तम दर्जाच्या आयव्ही लीग (Ivy League) कॉलेजात जायचे होते. पण ह्या वर्षी त्याच्या वडलांना धंद्यात बरीच खोट आली. त्यांना मदत म्हणून ॲलन नोकरी करत होता. त्यामुळे अभ्यासाला वेळ मिळाला नाही म्हणून म्हणा किंवा ॲलनने खूप मन लावून अभ्यास केला नाही म्हणून म्हणा ॲलनला गावातल्या उत्तम कॉलेजात ॲडमिशन मिळाली नाही. एका परगावच्या आयव्ही लीग कॉलेजने ॲलनला ॲडमिशन दिली. फीसाठी व राहण्यासाठी स्कॉलरशिप व कर्ज पण द्यायला ते कॉलेज तयार होते. परंतु आई-वडील धंद्यात आलेल्या खोटीमुळे इतक्या अडचणीत असताना त्यांना सोडून लांब कॉलेजसाठी जावे हे काही ॲलनच्या मनाला पटेना.

गावातल्या दुसऱ्या पण थोड्या कमी दर्जाच्या कॉलेजात जायची पण त्याला इच्छा नव्हती. शेवटी एक वर्ष नोकरी करून फावल्या वेळात आई-वडलांना धंद्यात मदत करावी मग पुढच्या वर्षापर्यंत धंद्याची परिस्थिती सुधारली की कॉलेजात जावं,असं ॲलननं ठरवलं आणि ही नोकरी पत्करली.

आणखी दोन आठवड्यांनी रोवनने वर्तवल्याप्रमाणे मिस्टर ट्रेसी ॲलनच्या मेल रूममध्ये सकाळी आले. "हॅलो, मी मिस्टर ट्रेसी" म्हणून स्वतःची ॲलनला ओळख करून देत त्यांनी मेल रूममधल्या छोट्या स्टुलावर बैठक मारली. रोवन आता आपल्या नव्या नोकरीवर रुजू झाला होता. त्यामुळे ॲलन एकटाच होता. ॲलननं उभं राहून मिस्टर ट्रेसींना अभिवादन केलं व आपलं नाव सांगितलं.

"चल,तुला मदत करतो." म्हणत मिस्टर ट्रेसी अगदी सहजरित्या टपाल निवडून वेगवेगळ्या ढिगात टाकू लागले.

"ह्या कंपनीत मी नोकरीला लागलो तेव्हा एकोणीस वर्षांचा होतो. तू किती वर्षांचा आहेस ॲलन?"

"एकोणीस" ॲलनने उत्तर दिले.

"बरोबर दोन वर्षे इथे होतो. नंतर विक्रीखात्यात गेलो. अगदी खरं सांगू? मेल रूममध्ये मला फारच मजा आली."

"आपण विक्री खात्याचा व्हाइस प्रेसिडेंट होतो. तुम्ही मेल बॉय व्हा हा जॉब एवढा आवडतो तुम्हाला तर!" असं चावट उत्तर ॲलनच्या जिभेवर आलं. पण मिस्टर ट्रेसीच्या हृद्‌याचा विचार करून त्यानं ते आवरलं.

मिस्टर ट्रेसी थोडा वेळ बसले मग ते "पुन्हा मदतीला येईन" असं आश्र्वासन देऊन उठून गेले.

आणखी पंधरा दिवसांनी एका गुरुवारी ॲलन,रोवन व इतर मुलगे-मुली कॅफेटेरियात मिटींगला येणाऱ्या व्हाइस प्रेसिडेंट्सकडे बघत बसले होते. नेहमीप्रमाणे विनोद चालले होते.

मिस्टर ट्रेसी मिटींगला आले. ते जाता जाता रोवन ॲलनच्या टेबलापाशी थांबले.

"काय रोवन, नवा जॉब कसा आहे?"

"चांगला आहे. सवय होतेय अजून" रोवनने उत्तर दिलं.

मग मिस्टर ट्रेसीने खोल विचारात गढलेल्या ॲलनच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं, "काय ॲलन, कसल्या विचारात गढला आहे?"

"तुम्हा सर्व व्हाइस प्रेसिडेंट्सचा हेवा वाटतो मला!" ॲलन नकळत बोलून गेला.

"काय?" मिस्टर ट्रेसी चमकले आणि उद्‌गारले, "आमचा हेवा? अरे उलट ...." पण एकदम ते थांबले. त्यांनी वाक्य अर्धवट तोडले. क्षणभर तेही खोल विचारात गढल्यासारखे वाटले. मग हसून म्हणाले, "जाऊ दे ॲलन. तुला कळणार नाही. मला काय म्हणायचंय ते !"

ॲलन दोन दिवस मिस्टर ट्रेसीच्या उद्‌गारामागे काय विचार दडला होता ह्याचा शोध लावण्याचा प्रयत्न करत राहिला. पण तो सुप्त अर्थ त्याला उकलेनाच.

आणखी एक वर्ष गेलं. ॲलनने चांगल्या कॉलेजात जायचा नाद सोडला. संध्याकाळी कॉलेजात जाऊन तो नोकरी करत राहिला. त्याने मेलरूममधली नोकरी बदलून रिसर्च आणि डेव्हलपमेंट खात्यात नोकरी पत्करली. तो व रोवन दोघेही वर वर चढत गेले. आणखी तीस वर्षांनी ते आपल्या खात्यांचे व्हाइस प्रेसिडेंटही झाले.

मिस्टर ट्रेसी केव्हाच रिटायर्ड होऊन कुठे तरी दूर राहायला गेले होते. त्यांनी अर्धवट तोडलेले वाक्य, "आमचा हेवा? अरे उलट..." हे ॲलनच्या काही वर्षे लक्षात होते. पण एव्हाना ते तो पूर्ण विसरून गेला होता. हल्ली मधून मधून तोही मिस्टर ट्रेसीसारखा मेलरूममध्ये जायचा. मेल निववडायचा. नवा मेलबॉय आला की त्याची ओळख करून घ्यायचा.

एकदा असाच तो व रोवन व्हाइस प्रेसिडेंटच्या मिटिंगनंतर बाहेर पडत होते. ते पूर्वी बसून लंच घेत असत त्याच टेबलावर एक अठरा - वीस वर्षांच्या तरुण - तरुणींचे टोळके बसले होते. हास्यविनोदाला त्या टेबलावर ऊत आला होता.

“नवा मेल बॉय लागला गेल्या आठवड्यात कामाला. भेटला का तुला?” ॲलन रोवनला विचारू लागला.

“नाही अजून!” रोवन म्हणाला. मग त्या दोघांनीही त्या टेबलकडे पाहत “हॅलो” म्हणत हात वरती करून हलवला.

“कसे बघतायेत आपल्याकडे बघ ते!” रोवन त्या टेबलाकडे पाहत म्हणाला. “त्यांच्या डोळ्यातून हेवा उफाळतोय! पण त्यांना काय माहित, आपल्यालाच उलट त्यांचा हेवा वाटतोय ते! त्यांच्या तारुण्याचा हेवा!”

ॲलन चमकला. त्याला एकदम ट्रेसींचे उद्‌गार आठवले, “आमचा हेवा! अरे उलट...”

तब्बल तीस वर्षांनी त्याला मिस्टर ट्रेसींच्या अर्धवट उद्‌गारामागचा अध्याहृत अर्थ उलगडला होता.

पूर्व प्रसिद्धी :
पक्षी जाय देशांतरा, १४ नोव्हेंबर १९९३.